# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,

दापोली ४१५ ७१२ जि. रत्नागिरी महाराष्ट

दुरध्वनी ०२३५८-२८३९६३


## मत्स्य अभियांत्रिकी पदविकाधारकासाठी मत्स्य विज्ञान पदवीच्या थेट द्वितीय वर्षामध्ये प्रवेश २०२४-२०२५

महाराष्ट राज्यातील डॉ. बाळाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठांतर्गत सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षामधील मत्स्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या थेट दुस-या वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठामार्फत ऑफलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहे.

**अभ्यासक्रम, प्रवेश पात्रता व जागा**

| अभ्यासक्रम | प्रवेश पात्रता व जागा |
|---|---|
| बी.एफएसृसी मत्स्यविज्ञान | तीन वर्षाची मत्स्य अभियांत्रिकी पदविका(Diploma in Fisheries Engineering) |
| | प्रवेश क्षमतेच्या २० टक्के अतिरिक्त जागा |

सन २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षातील मत्स्य अभियांत्रिकी पदविकाधारकांसाठीची प्रवेश प्रक्रिया डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठामार्फत ऑफलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहे. यासाठी प्रवेश माहिती पुस्तिका विद्यापीठाच्या www.dbskkv.org या संकेतस्थळावर दिनांक १३/०६/२०२४ पासून उपलब्ध करून देण्यात येईल. प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी कार्यपध्दती खालील प्रमाणे आहे.

<u>प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी अवलंबवयाची कार्यपध्दती-</u>

१. उमेदवाराने प्रवेश अर्ज दि. १३/०६/२०२४ ते १८/०६/२०२४ दरम्यान मत्स्य महाविद्यालय, शिरगांव रत्नागिरी येथे ऑफलाईन पध्दतीने सादर करावा.

२. ऑफलाईन अर्ज भरताना उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे छायाचित्र, आवश्यक ती संबंधीत मुळ कागदपत्रे जोडावित.

३. प्रवेश अर्ज किंवा कागदपत्रे टपालाने /कुरीअरने पाठविण्यात येवू नयेत.

४. प्रवेश शुल्क

- खुल्या प्रवर्गासाठी रू १०००/-
- आरक्षित प्रवर्गासाठी रू ५००/- अ.जा.,अ.ज,वि.जा, भ.ज, इ.मा.व, वि.मा.प्र, आर्थिक दुर्बल घटक.
- आर्थिक दुर्बल घटक वगळता जात वैधता प्रमाणपत्र तसेच उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य आहे.
- प्रवेश क्षमता, आरक्षण, प्रवेश कार्यपध्दती इत्यादी सविस्तर तपशिलांचा अंतर्भाव असलेली प्रवेश माहिती पुस्तिका व प्रवेश अर्ज १३/०६/२०२४ पासून उपरोक्त विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

सही/-

कुलसचिव

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण

कृषि विद्यापीठ, दापोली जि. रत्नागिरी